■ वर्ष- ११ ■ अंक- ५२ ■ मुंबई, मंगळवार, ११ नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर २०२५ ■ पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION

No. PLG/205/2025- 2027

पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

● संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG|2

मधुमेह आणि फळे

3 → शेतकऱ्यांना कर्जमाफीचा दिलासा मिळणार?

नोकरीसाठी कामगाराकडून बनावट प्रमाणपत्राचा जुगाड ← 4

www.policebatmipatra.in policebatmi police batmi patra policebatmipatra policebatmipatra@gmail.com

गुन्हेगारांचे धाबे दणाणले, भाईगिरी करणाऱ्यांचा करेक्ट कार्यक्रम, कल्याण पोलिसांचं कौतुक

कल्याण। दारूच्या नशेत दोघे कल्याणच्या स्टेशन परिसरात आले. खिशातून सिगारेट काढली. टपरी चालकाकडून माचिस मागितली. मात्र टपरी चालकाने माचिस देण्यास नकार दिला. या कारणावरुन संतप्त झालेल्या दोघा कथित भाईंनी कमरेला खोचलेला कोयता काढून दहशत माजवली. हातातील कोयता पाहून सानांची पळता भुई थोडी झाली. या घटनेचा व्हिडिओ समाज माध्यमांवर व्हायरल झाला. मात्र महात्मा फुले चौक पोलिसांनी शोध घेऊन दहशत माजविणाऱ्या दोघा कथित भाईंना गचांडी पकडून गजाआड केले.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हे दोघे दारूच्या नशेत कल्याण पूर्वेतून पश्चिमेतील स्टेशन परिसरात आले. त्यांनी सिगारेट सोडण्याकरिता टपरी चालकाकडे माचिस मागितली. टपरीवाल्याने माचिस देण्यास नकार दिल्यामुळे संतापलेल्या दोघांनी कोयता घेऊन दहशत माजविण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

समाज माध्यमांवर धुमाकूळ घालणाऱ्या या व्हिडिओमध्ये दोन तरूण दिसत आहेत. दोघांपैकी एक जण लोकांना शिवीगाळ करताना दिसत आहे. तर दुसरा हातात कोयता घेऊन उभा आहे. आमच्या नादाला लागू नका, एक एकेकाला खल्लास करून टाकणार, अशा धमक्या देणाऱ्या या कथित भाईंचा कारनामा एका बहाद्दर जागरूक नागरिकाने मोबाईलमध्ये कैद केला. हा व्हिडिओ समाज माध्यमांवर व्हायरल झाल्यानंतर कल्याणच्या महात्मा फुले चौक पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला.

वरिष्ठ पोलीस निरिक्षक बाळकृष्ण परदेशी यांनी तपास कामाकरिता पथके तयार केली. पोलिसांनी दोघांचा शोध घेतला. मध्यरात्रीच्या सुमारास हातात कोयता घेऊन दहशत माजविणाऱ्या त्या दोन्ही कथित भाईंना बेड्या ठोकून गजाआड केले. निलेश शेलार आणि मेघनाथ भंडारी अशी अटक करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. दोघेही कल्याण पूर्वेतील कोळसेवाडी परिसरातील राहणारे आहेत. या घटनेचा ट्रॅक रेकॉर्ड आहे का? याचा चौकस तपास पोलीस करत आहेत. कल्याणमध्ये गुन्हेगारीच्या घटना सातत्याने समोर येत असतात. गुन्हेगार सर्रासपणे नको ते कृत्य करतात. त्यामुळे त्यांना पोलिसांचा भय नाही का? असादेखील प्रश्न उपस्थित होतो. दरम्यान, भाईगिरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या गावगुंडांना पोलिसांनी योग्य धडा शिकवल्याने आता पोलिसांचं देखील कौतुक होत आहे.

ठाण्यात स्कुटीवर स्टंट करताना शेजारच्या गाडीला घातली लाथ
त्याचक्षणी पोलिसांनी पाहिल... शिकवला आयुष्यभराचा धडा

पेण। रस्त्यांवर रात्रीच्या वेळी अनेक तरुण दुचाकीवरुन हुल्लडबाजी करताना दिसतात. रस्त्यांवर स्टंट करत ते आपल्यासह इतरांचाही जीव धोक्यात घालण्याचा प्रयत्न करत असतात. पोलीस असणार नाहीत अशी ठिकाणं निवडत तिथे सर्रासपणे हे स्टंट आणि हुल्लडबाजी सुरु असते. अशा तरुणांवर कारवाई करण्यासाठी नागरिक नेहमी आग्रह करत असतात. दरम्यान असाच ठाण्यात एका हुल्लडबाज तरुणाचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. त्याच्या दुर्दैवाने हुल्लडबाजी करताना पोलीस त्याच्या मागून दुचाकीवरुन जात होते. यानंतर पोलिसांनी त्याला आयुष्यभराचा धडा शिकवला आहे. ठाण्यातील मुंब्रा येथील एक तरुण स्कुटीवरुन हुल्लडबाजी करतानाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या व्हिडीओ एक तरुण स्कुटी बेदरकारपणे चालवत स्टंटबाजी करताना दिसत आहे. यादरम्यान त्याने



एका बाईकस्वाराला लाथ घालून खाली पाडण्याचाही प्रयत्न केला. दरम्यान याचवेळी मागून पोलिसांची बाईक येत असल्याची त्याला अजिबात कल्पना नव्हती. ज्यामुळे त्याला आयुष्यभराचा धडा मिळाला आहे. तरुण हुल्लडबाजी करत असताना मागे बाईकवर दोन पोलीस कर्मचारी गस्तीवर फिरत होते. तरुण हुल्लडबाजी करत असल्याचं पाहिल्यानंतर त्यांना त्याला रस्त्यातच अडवलं. यानंतर त्याला कॅमेऱ्यासमोर हात जोडून माफी मागायला लावली.

बनावट ट्रॅफिक ई-चलन, सिम हायजॅकपासून सावध राहा
सायबर पोलिसांचा इशारा

मुंबई। नागरिकांना बनावट ट्रॅफिक ई-चलन आणि बनावट क्रेडिट कार्ड ऑफरच्या माध्यमातून होणाऱ्या सिम हायजॅक फसवणुकीबाबत सावधानतेचा इशारा सायबर गुन्हे शाखेने दिला आहे.

सायबर गुन्हेगार ट्रॅफिक पोलिसांच्या नावावर 'व्हॉट्सॲप'वर बनावट संदेश पाठवत आहेत. या संदेशांमध्ये घातक लिंक असतात. हे संदेश अज्ञात क्रमांकावरून आलेले असतात. ज्यात पाठवणारा स्वतःला ट्रॅफिक पोलीस म्हणून दाखवतो.

'ट्रॅफिक फाइन' किंवा 'आरटीओ चलन' अशा संशयास्पद नावांची एपीके फाइल्स, वैयक्तिक यूपीआय



वैयक्तिक यूपीआय हँडलवर पैसे भरू नयेत,'' असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. 'फसवे लोक आकर्षक क्रेडिट कार्ड ऑफर देत पीडितांशी संपर्क साधतात. बँक अधिकाऱ्यांचे रूप घेऊन पीडितांकडून महत्त्वाची आयडीवर पैसे भरण्याची माहिती गोळा करतात.'

विनंती आणि .gov. in ने न संपणाऱ्या किंवा parivahan.gov.in शी संबंध नसलेल्या वेबसाइट लिंक असतात.

''नागरिकांनी संशयास्पद लिंकवर क्लिक करू नये, अनोळखी एपीके फाइल डाऊनलोड करू नये आणि

बनावट कागदपत्रांचा वापर करून ते टेलिकॉम कंपनीकडे 'सिम स्वॅप'ची मागणी करतात. एकदा नवीन सिम फसवणूक करणाऱ्याच्या ताब्यात गेल्यावर, त्यांना पीडिताच्या बँक, यूपीआय आणि कार्डशी संबंधित सर्व ओटीपी आणि अलर्ट मिळतात.

९ मित्रांनी जेवायला बोलवलं अन् तिथेच घात केला... पुरावे मिळू नये म्हणून अमानुष प्रकार

मुंबई। अक्षय नागलकर 22 ऑक्टोबरला आपल्या एका मित्रासोबत बाहेर गेला. मित्रावर विश्वास असल्याने अक्षय बिंधास्त त्याच्यासोबत एका धाब्यावर जेवण करायला सुद्धा गेला आणि अक्षय सोबत नऊ जणांनी घात करून त्याची हत्या केली. अक्षय घरी परतला नसल्याने आईने अकोला शहरातील डाबकी रोड पोलीस ठाण्यात अक्षयच्या बेपत्ता होण्याची तक्रार दिली आणि प्रकरणातील रहस्य अखेर उघड झाले. तब्बल तीन दिवसां नंतर बेपत्ता असलेला अक्षय नागलकरला त्याच्याच 9 मित्रांनी निर्दयपणे जाळून ठार केल्याचं समोर आलं.

काय आहे नेमकी संपूर्ण घटना ?

अक्षय नागलकर २२ ऑक्टोबरपासून बेपत्ता होता.त्याच्या कुटुंबीयांनी अकोला शहरातील डाबकी रोड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. पोलिस यंत्रणांनी त्याचा तीन दिवस शोध घेतला. दरम्यान, अकोला जिल्ह्यातील मोरगाव भाकरे परिसरात अक्षयला मारून जाळल्याचं धक्कादायक वास्तव समोर आलं. या घटनेमुळे अकोला शहरात मोठा संताप उसळला. पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, आरोपींनी अक्षयला एका



धाब्यावर जेवणासाठी बोलावलं आणि त्यानंतर त्याच्या डोळ्यात मिरची पावडर टाकून धारदार शस्त्राने त्याच्यावर वार केले. त्यानंतर आरोपींनी अक्षयचा मृतदेह शेतशिवारातील एका टीनच्या शेडमध्ये नेऊन पुरावे नष्ट करण्याच्या हेतूने जाळून टाकला. इतकंच नव्हे तर आरोपी मृतदेहाची राख पूर्णतः नष्ट होईपर्यंत तिथेच थांबले आणि नंतर ती राख गायब करून संपूर्ण टीन शेड रंगवून टाकली.

कोण होता अक्षय नागलकर?

अक्षय नागलकर हा गोरक्षक आणि हिंदुत्ववादी कार्यकर्ता म्हणून ओळखला जात होता. त्याच्या खुनामागे वैयक्तिक वाद असल्याची प्राथमिक माहिती पोलिसांकडून समोर आली आहे. या प्रकरणात पोलिसांनी सुरुवातीला चार आरोपींना ताब्यात घेतलं. या मध्ये मुख्य आरोपी असलेल्या चंद्रकांत बोरकरचा ही समावेश होता. पोलिसांनी उर्वरित पाच आरोपींचा शोध सुरू ठेवला, यानंतर चार आणखी आरोपींना पोलिसांनी जेरबंद केलं तर एक आरोपी फारच राहिला. शेवटी पोलिसांच्या अथक प्रयत्नानंतर शेवटच्या आरोपीपर्यंत ही पोलीस पोहोचली आणि या हत्याकांडातील नवही आरोपींना अटक करण्यात पोलिसांना यश मिळालं.

पोलीस तपासा आतापर्यंत काय निष्पन्न झालं ?

पोलिसांनी आतापर्यंत अक्षय नागरकर हत्याकांड प्रकरणात नऊ आरोपींना अटक केली आहे. आरोपींनी खुनाची कबुली दिली असून अकोल्यातील मोर्णा नदी पात्रातून पोलिसांनी बंदुकीच्या गोळीचा वापरलेला काडतूस तर बाळापूर येथील नदी नदीपात्रातून हाडांचे तुकडे शोधून काढल्याचा दावा केला आहे, जे तपासासाठी अत्यंत महत्वाचे ठरणार आहेत. या घटनेचे नियोजनपूर्वक स्वरूप लक्षात घेता, पोलिसांसमोर या प्रकरणाचा तपास अधिकच गुंतागुंतीचा ठरण्याची शक्यता आहे. पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न, आरोपींची संख्या आणि अत्यंत अमानुष पद्धतीने केलेली हत्या या सगळ्या गोष्टींमुळे हे प्रकरण अधिक संवेदनशील बनले आहे. अकोला पोलिसांकडून या संपूर्ण प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून, पुढील तपासात आणखी काही महत्वाचे तपशील समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात

पोलिसांसामोर आव्हान..

रहस्यमय आणि क्रूर अशा दोन्ही शब्दांचा प्रत्यय देणाऱ्या या प्रकरणामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. या भीषण हत्याकांडानंतर पोलिसांसमोर तपासाचं मोठं आव्हान उभं राहिलं आहे. आरोपींचा हेतू, खुनामागचं कारण आणि मृतदेहाशी संबंधित सत्य हे सर्व उघड करण्यासाठी पोलिसांची कसोटी लागणार आहे.

मोबाईल स्नॅचिंग करणारे चोर पकडले! आचोळे पोलीस ठाण्याचे धडाकेबाज कामगिरी

वसई। मोबाईल स्नॅचिंग करणारे चोर पकडण्यात आचोळे पोलीस ठाणेस यश. अधिकमाहितीनुसार दिनांक २३/१०/२०२५ रोजी फियार्दी अमित दयाशंकर तिवारी, वय २५ वर्ष व्यवसाय नोकरी रा. रुम नंबर डी/३०६ रश्मी कॉम्पलेक्स विनायक हॉस्पीटल मागे, एव्हरशाईन लास्ट स्टॉप नालासोपारा पुर्व ता. वसई जि.पालघर हे विनायका हॉस्पीटल, आचोळे रोड वरुन आठवडे बाजरासाठी जात असताना त्यांचे पाठीमागुन मोटार सायकलवरुन दोन अनोळखी इसम येवुन त्यांचा मोबाईल हिसकवत असताना फियार्दी यांनी त्यास विरोध केला असता त्यापैकी एका इसमाने त्यांचेजवळील लोखंडी फायटर सदृश्य हत्याराने त्यांच्या पोटामध्ये मारुन दुखापत करुन फियार्दीच्या हातातील ओपो कंपनीचा ए/४९ मॉडेलचा मोबाईल फोन हा जबरजस्तीने खेचुन नेवुन जबरी चोरी करुन पळून गेले म्हणुन आचोळे पोलीस ठाणे दिनांक २४/१०/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वरील प्रमाणे गुन्हा नोंद झाल्यानंतर मा. वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाखाली नमुद अनोळखी चोरट्यांचा शोध घेण्या बाबत गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांना सुचना देण्यात आल्या होत्या.



त्याप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी अंमलदार हे सदर आरोपींचा शोध घेत होते.

आचोळे पोलीस ठाणे गुन्हेप्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीमध्ये अनोळखी आरोपी यांची ओळख पटवण्यासाठी आरोपी यांनी गुन्ह्यात वापरलेल्या मोटार सायकलचा नंबर एम. एच ४८ सी.एल २८२२ असा असल्याचे स्पष्ट झाले. त्याआधारे नमुद आरोपी याचा पोलीस शोध घेत असताना सदरचे आरोपी हा स्वतःचे अस्तित्व लपवुन वेळोवेळी जागा बदलुन फिरत होते. त्यावेळी गुन्हेप्रकटीकरण शाखेच्या अंमलदार यांनी कौशल्यपुर्ण तपास करुन गुन्ह्यात वापरलेल्या मोटार सायकलचा शोध घेतला असता नमुद मोटार सायकल व त्यावर दोन इसम हे नालासोपारा परिसरात फिरत असल्याचे दिसुन आले. त्यावेळी त्यांना डी मार्ट जवळ, नालासोपारा पूर्व येथे मोटार सायकलसह ताब्यात घेतले. नमुद संशयीत इसम १) सागर राजेश मिश्रा वय २२ वर्षे, व्यवसाय पेस्ट कंन्ट्रोल, रा.रु नं-ए/१०५, अदर्श निवास, जे.बी.एस गल्ली, अलकापुरी, नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर २) सागर सुनिल वर्मा वय-१९ वर्षे, व्यवसाय-नोकरी, रा.रु.नं-बी/२०५, साई सदन बिल्डींग, सर्वे नं-१११, अलकापुरी, नालासोपारा पुर्व ता.वसई जि. पालघर यांना नमुद गुन्हयात अटक करण्यात आली.नमुद गुन्ह्यात अटक आरोपी १) सागर राजेश मिश्रा २) सागर सुनिल वर्मा यांचेकडे गुन्हयातील चोरलेल्या मुद्देमालाबाबत कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता दोन्ही आरोपी यांनी आचोळे पोलीस ठाणे हद्दीतुन एकुण २४ मोबाईल खेचुन जबरी चोरी केली असल्याचे पोलीसांना सांगितले. नमुद आरोपी यांचे ताब्यातुन वर नमुद गुन्हयामध्ये चोरीस गेलेला मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन यापुवीर्ही चोरी केलेले एकुण वेग वेगळ्या कंपनीचे २४ मोबाईल तसेच गुन्हयात वापरलेली ०१ मोटार सायकल असा एकुण ३,२३,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन खालील गुन्ह्याची यशस्वी उकल केली आहे. सदरची कामगिरी मा. श्रीमती. पौर्णिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त परिमंडळ २, मा. श्री. उमेश माने-पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त तुळींज विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. सुजितकुमार पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, आचोळे पोलीस ठाणे, पोलीस निरीक्षक/अनंत पेडणेकर (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोउनि/मंगेश वडणे, पोउनि/गुरुदास मोरे, सफौ/दत्तात्रय दाईगडे, पोहवा/शंकर शिंदे, पोहवा/निखील चव्हाण, पोहवा/विनायक कचरे, पोहवा/अमोल सांगळे, पोअं/मोहनदास बंडगर, पोअं/मनोज पाईकराव, पोअं/गोविंद गुट्टे, पोअं/लोकेश कुवर, पोअं/सुशांत भोये, मसुब/मनिष बोपटे, व पोहवा/अमोल बरडे नेम.पो.उ.आ कार्यालय परिमंडळ २ वसई यांनी यशस्वी रित्या केलेली आहे.

कल्याणमध्ये ३० वर्षांपासून राहणाऱ्या नेपाळी महिलेचा पर्दाफाश
भारतीय कागदपत्रांसह मुंबई विमानतळावर घेतले ताब्यात

मुंबई। छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर इमिग्रेशन अधिकाऱ्यांनी एका महिलेचा पदार्फाश केला आहे. शांती अर्जुनसिंग थापा नावाची ही महिला प्रत्यक्षात नेपाळची नागरिक असून ती गेली ३० वर्षे कल्याणमध्ये राहत असल्याचे समोर आले आहे. धक्कादायक म्हणजे परदेशी नागरिक असूनही तिच्याकडे भारतीय मतदार ओळखपत्र, आधार कार्ड आणि पॅन कार्ड मिळाले असून तिने महाराष्ट्रातील निवडणुकांमध्ये अनेकदा मतदानही केल्याचा खुलासा झाला आहे.

समाधानकारक उत्तर न दिल्याने अधिकाऱ्यांना आला संशय

एफआयआरनुसार, ही महिला २४ ऑक्टोबर रोजी नेपाळमधील काठमांडूहून मुंबई विमानतळावर आरए-२०१ या विमानाने आली होती. नियमित इमिग्रेशन तपासणीदरम्यान तिने भारतीय मतदार ओळखपत्र (लळद०८९०४२६) आणि बोर्डिंग पास सादर केला. तिच्याकडून प्रवासाचे उद्दिष्ट आणि राष्ट्रीयत्वाबाबत विचारले असता ती समाधानकारक उत्तर देऊ शकली नाही. तिच्या नावातील विसंगती आणि उत्तरांमुळे अधिकाऱ्यांना संशय आला आणि पुढील चौकशीसाठी तिला इमिग्रेशन विभागाच्या विंग इन्चार्जकडे सोपवण्यात आले.

चौकशीत उघड झाले की ही महिला प्रत्यक्षात नेपाळची नागरिक असून तिचे खरे नाव चंदा रेग्मी आहे. तिचा जन्म २५



प्रथम प्रतिलिपि

नेपाल सरकार

गृह मन्त्रालय काठमाडौं

जिल्ला प्रशासन कार्यालय, ...

नेपाली नागरिकताको प्रमाणपत्र

ना.प्र.नं. ९७७८

नाम थर: चन्दा रेग्मी — लिङ्ग: महिला

जन्म स्थान: जिल्ला : काठमाडौं — वडा नं. ५

गा.वि.स.: फुटुङ्

स्थायी बासस्थान: जिल्ला : काठमाडौं — वडा नं. १६

म.न.पा.: काठमाडौं

जन्म मिति: साल: २०३३ महिना: ०८ गते: १०

बाबुको नाम थर: गणेश बहादुर के.सी. — ना.प्र.नं.:

ठेगाना: फुटुङ् गा.वि. स.-४, काठमाडौं — ना. कि. नं.:

आमाको नाम थर: XXX — ना.प्र.नं.:

ठेगाना: — ना. कि.

पति/पत्नीको नामथर: अर्जुन रेग्मी — ना.प्र.नं.:

ठेगाना: काठमाडौं म.न.पा.-१६, काठमाडौं — ना. कि.:

नोव्हेंबर १९७६ रोजी नेपाळची राजधानी काठमांडू जिल्ह्यातील फुतुंग येथे झाला होता. ती गेल्या अनेक वर्षापासून ठाणे जिल्ह्यातील कल्याण येथे राहत आहे. तपासानुसार, चंदा १९९६ साली आपला पती अर्जुनसिंग थापा याच्यासह भारतात आली आणि ठाण्यातील डोंबिवली (पूर्व) येथील सागावजवळील बुद्ध विहार परिसरातील जय कमल रेसिडेन्सी येथे राहत होती. या दरम्यान तिने निवडणूक आयोगाला खोटी माहिती देऊन मतदार ओळखपत्र, आधार आणि पॅनकार्डसह भारतीय ओळखपत्रे फसवणुकीने मिळवली. तिने या खोट्या भारतीय मतदार ओळखपत्राचा वापर करून भारत आणि नेपाळदरम्यान अनेक वेळा प्रवास केला होता, ज्यामध्ये २४ ऑक्टोबरचा अलीकडील प्रवासही समाविष्ट आहे.

चौकशीदरम्यान तिने आपल्या नावावर असलेले नेपाळचे नागरिकत्व प्रमाणपत्रही सादर केले, ज्यामुळे तिचे नेपाळी नागरिकत्व निश्चित झाले. मतदार यादींच्या प्रामाणिकतेबाबत गंभीर प्रश्न दुहेरी ओळख आणि फसवे कागदपत्रे सिद्ध झाल्यानंतर इमिग्रेशन अधिकाऱ्यांनी तिला पुढील तपासासाठी सहार पोलिसांकडे सोपवले आहे. पोलिस सूत्रांच्या माहितीनुसार, या प्रकरणामुळे काही परदेशी नागरिक फसवणुकीने भारतीय मतदार म्हणून नोंदणी करत असल्याचे आणि सरकारी ओळखपत्रे मिळवत असल्याचे स्पष्ट झाले असून, यामुळे मतदार यादींच्या प्रामाणिकतेबाबत आणि दस्तऐवज पडताळणी प्रक्रियेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. सहार पोलिस या प्रकरणाशी संबंधित इतर आरोपींचा शोध घेत तपास करत आहेत. शांती उर्फ चंदा (वय ४९) हिच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इठर) च्या कलम ३३६(२), ३३६(३), ३४०(२) आणि ३१८(४) अंतर्गत फसवणूक, बनावट कागदपत्र तयार करणे आणि सरकारी कागदपत्रांसाठी खोटी माहिती देणे या आरोपांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मशरुम्सची भाजी



साहित्य : मशरुम - २०० ग्रॅम, कांदा - १ मध्यम आकाराचा, तिखट - १ चमचा, हळद - १/२ चमचा, मीठ - चवीनुसार, जिरे - १ छोटा चमचा, तेल - फोडणीसाठी, आले-लसूण पेस्ट - १ छोटा चमचा, थोडी कोथिंबीर.

पाककृती : कांदा, कोथिंबीर बारीक चिरून घ्या. मशरुम्स उभे पातळ कापून घ्या. फोडणीसाठी तेल गरम करून जिरे, आले-लसूण पेस्ट, कांदा घालून परतून घ्या. कांदा थोडा शिजल्यावर मशरुम्स घालून परतून घ्या. नंतर हळद आणि तिखट घाला. झाकण ठेवून २ मि. शिजू द्या. या वेळात मशरुम्सना पाणी सुटेल, मग मीठ व कोथिंबीर घालून, गॅस मध्यम आचेवर ठेवून हे पाणी आटेपर्यंत शिजू द्या.

चेहऱ्यावरील तीळ हटवण्याचे आठ घरगुती उपाय

चेहऱ्यावरचा एखादा तीळ ब्यूटीमार्क असू शकतो. परंतु, चेहऱ्यावर अधिक तीळ असल्यास किंवा त्यांची जागा चुकीची असल्यास ते खटकतात. शरीरावरील तीळ काढून टाकण्यासाठी काही डर्मेटोलॉजिक ट्रीटमेंट आहेत, परंतु घरगुती उपायांनीदेखील तीळ हटवले जाऊ शकतात, हे तुम्हाला ठाऊक आहे का?



▮ कोथिंबीरच्या काही पानांची पेस्ट करा. ही पेस्ट काही दिवस तुम्हांला नको असलेल्या तिळावर नियमित लावा.

▮ एरंडेल तेलाच्या मॉलिशमुळेदेखील तिळापासून सुटका मिळू शकते. हळूहळू तीळ कमी होण्यास सुरूवात होईल.

▮ मध आणि सूर्यफूलाच्या बीयांच्या तेलाचे मिश्रण करा. या मिश्रणाचा तीळावर पाच मिनिटं मसाज करा. यामुळे त्वचा तजेलदार होईल सोबतच तिळ कमी होण्यास मदत होईल.

▮ कपभर अननसाचा रस आणि पाव कप सैंधव मीठ एकत्र करा. या मिश्रणाने स्क्रब केल्यास चेहऱ्यावरील तीळ कमी होण्यास मदत होईल.

▮ लसणाची पेस्ट रात्री झोपण्यापूर्वी तिळावर लावा. त्यावर बॅण्डेज लावा. सकाळी उठल्यावर त्वचा कोमट पाण्याने स्वच्छ धुवा. हा प्रयोग नियमित केल्यास तिळाचा त्रास कमी होण्यास मदत होईल.

▮ काही आल्याचे तुकडे ठेचून तिळाच्या जागी लावा. त्यावर कपडा बांधून झोपा. या उपायानेही तीळ कमी होण्यास मदत होते.

▮ व्हिटॅमिन सीची एक गोळी बारीक कुटा. रात्री ही पेस्ट तिळावर लावून, त्यावर बॅण्डेज लावून झोपा.

▮ व्हिनेगरचा वापर करूनदेखील तीळ हटवला जाऊ शकतो. सुरुवातीला चेहरा गरम पाण्याने धुवा. कापसाच्या बोळ्याने व्हिनेगर तिळावर लावा. १० मिनिटांनंतर चेहरा गरम पाण्याने स्वच्छ धुवावा.

मधुमेह आणि फळे

मधुमेह हा आजार असलेल्या व्यक्तींनी आहाराबाबत सजग राहणे आवश्यक असते. फळांचे सेवन करताना काळजी घेतली पाहिजे , अन्यथा या फळांच्या सेवनाने रक्तातील साखरेचे प्रमाण वाढू शकते. बऱ्याच जणांचा असा गैरसमज असतो की फळांमध्ये नैसर्गिक साखर असल्याने रक्तातील साखर वाढत नाही. फळे सेवन केलेली चालतात, असे मानून मधुमेहाचे रुग्ण फळांचे सेवन करतात. पण फळांमध्ये असलेली नैसर्गिक साखर



चेरी : चेरीमध्ये खूप जास्त साखर असते, त्यामुळेच आईस्क्रीम आदी गोष्टी तयार करण्यासाठी चेरीचा वापर केला जातो. एका चेरीमध्ये सुमारे ८ ग्रॅम साखर असते, त्यामुळे चेरीचे सेवन करताना काळजी घेतली पाहिजे आणि विशिष्ट प्रमाणातच चेरीचे सेवन केले पाहिजे. चेरीच्या सेवनाने रक्तातील शर्करेची पातळी वाढू शकते.

आंबा : आंबा हा वर्षातून एकदाच मिळणाऱ्या फळांपैकी एक आहे आणि बहुतेकांना आंबा खूप आवडतो. परंतु त्यातही नैसर्गिक साखरेचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे मधुमेहाच्या रुग्णांनी आंब्याचे सेवन करणे शक्यतो टाळले पाहिजे. सर्वसाधारणपणे एका आंब्यामध्ये ४५ ग्रॅम इतकी नैसर्गिक साखर असते.

द्राक्षे : रक्तातील साखरेची पातळी योग्य राखायची असेल, तर द्राक्षांचे सेवन करणे टाळावे. कारण द्राक्षही गोड असतात. एक कप द्राक्षांतून शरीरात २३ ग्रॅम साखर जाऊ शकते.

लिची : हे फळही जास्त साखरेचे प्रमाण असलेल्या फळांपैकी एक आहे. त्यामुळे रक्तातील साखर वाढू शकते. एक कप लिची फळांमध्ये २९ ग्रॅम एवढी नैसर्गिक साखर असते.

डाळिंब : डाळिंब रक्तातील ऑक्सिजनचे प्रमाण वाढवते, परंतु त्यातही साखरेचे प्रमाण अधिक असल्याने त्याचे सेवन केल्यास मधुमेही रुग्णांमध्ये रक्तातील साखरेचे प्रमाण वाढू शकते. एका साधारण आकाराच्या डाळिंबामध्ये ३९ ग्रॅमपर्यंत साखर असते. मधुमेही रुग्णांनी डाळिंबाचे सेवन टाळले पाहिजे.

मधुमेही रुग्णांनी वरील फळे टाळावी तसेच कोणतेही इतर फळ सेवन करताना विशिष्ट प्रमाणातच सेवन करावे, जेणेकरून रक्तशर्करेचे प्रमाण योग्य राहील. मधुमेही रुग्णांना रक्तातील साखर कमी होऊ द्यायची नसते, तशीच ती वाढूनही उपयोग नाही, त्यामुळे ठरावीक वेळेला आहार सेवन करतानाही तो योग्य प्रमाणात सेवन केला पाहिजे.

व्यायामानंतर खाज येत असल्यास...

खाज येण्याच्या समस्येला प्रुराईटस देखील म्हटले जाते. व्यायामादरम्यान खाज आल्याने त्वचेच्या पेशींना त्रास होतो किंवा इरिटेशन होते. सर्वसाधारणपणे अचानक तापमानात झालेले बदल, संसर्ग किंवा सौंदर्यप्रसाधनांची प्रतिक्रिया यामुळे हे होते. काही व्यक्तींमध्ये प्रतिकारशक्ती कमजोर असल्यास ही लक्षणे दिसतात. अशाच प्रकारे जेव्हा आपण वेगात चालतो तेव्हा किंवा थंड जागेवरून गरम जागी जातो आणि थोडे श्रम करतो, तेव्हा खाज येऊ शकते. शरीरातील नसांमध्ये प्रुरिसेप्टर्स असतात. जेव्हा वातावरणात अचानक बदल होतो किंवा त्वचेवर कोणतीही रासायनिक प्रतिक्रिया दिसते, तेव्हा हे प्रुरिसेप्टर्स कार्यान्वित होतात आणि मेंदू आणि मणका यांना संकेत पाठवतात. त्या संकेतांऐवजी मेंदू शरीरात अशा प्रकारच्या रसायनांची निर्मिती सुरू करतो जी या शारीरिक अवस्थेशी निपटण्यासाठी आवश्यक असते. शरीराची ही प्रतिक्रिया समजण्यासाठीच खाज येण्याची समस्या सुरू होते. शरीरांतर्गत रसायनांमुळेही पित्ताची समस्या निर्माण होते.

खाज कशी दूर करावी?

▮ व्यायामादरम्यान किंवा वेगाने चालताना किंवा अतिश्रम केल्यास शरीराला खाज येत असल्यास व्यायाम आणि श्रमाचे काम ताबडतोब थांबवा. एखाद्या उष्ण जागी असाल तर थंड जागी जाऊन थांबा. अशा परिस्थितीत हिवाळ्यापासून बचाव करण्यासाठी उबदार कपडे घातले असतील तर तेही काढून टाका आणि शरीराचे तापमान सर्वसामान्य कसे करता येईल यासाठी प्रयत्न करा. सतत खाज येत असेल तर वैद्यकीय सल्ला अवश्य घ्यावा.

▮ थंडीमुळे होणाऱ्या पित्ताने वैतागला असाल तर थंड पाण्याचा शेक घ्या. त्यामुळे रक्तवाहिन्या संकुचित होतात आणि हिस्टामिन या रसायनांचे अतिरिक्त वहन थांबवण्यास मदत करते. त्याचबरोबर पित्तामध्ये खाज येत असेल तर त्यावर उपाय म्हणून अर्धा कप दलिया पाण्याच्या टबात टाकून त्याने स्नान करावे.



व्हॉट्सॲप स्टेट्समध्ये शेअर करा एचडी फोटो आणि व्हिडीओ! आलं नवीन फीचर

व्हॉट्सॲपने एचडी फोटो आणि व्हिडीओ शेअरिंगचा अपडेट दिला आहे. आता व्हॉट्सॲप फोटो आणि व्हिडीओ स्टेट्समध्ये देखील क्वालिटी न बिघडवता शेअर करता येईल. हे फीचर अँड्रॉइड बीटा व्हर्जन २.२३.२६.३ मध्ये उपलब्ध आहे.

व्हॉट्सॲपने अलीकडेच हाय डेफिनिशन म्हणजे एचडी क्वालिटीमध्ये फोटो आणि व्हिडीओ शेअरिंगचा अपडेट दिला होता. त्यानंतर आता व्हॉट्सॲप एक नवीन अपडेटमधून एचडी फोटो व्हिडीओ स्टेट्स अपडेट करण्याचा ऑप्शन देत आहे. म्हणजे तुम्ही एचडी फॉर्मेटमध्ये फोटो आणि व्हिडीओ आपल्या व्हॉट्सॲप स्टेट्सवर शेअर करू शकाल. सध्या स्टेट्समध्ये फोटो आणि व्हिडीओ शेअर केल्यावर त्याची क्वालिटी



खराब होते. परंतु आता व्हॉट्सॲप फोटो व्हिडीओ शेअर केल्यावर त्यांची क्वालिटी खराब होणार नाही.

बीटा टेस्टरसाठी लाइव्ह झालं फीचर

नवीन एचडी फोटो आणि व्हिडीओ शेअरिंग फीचर अँड्रॉइड बीटा व्हर्जन २.२३.२६.३ साठी सादर करण्यात आलं आहे. यात जेव्हा तुम्ही व्हॉट्सॲप स्टेट्स शेअर कराल, तेव्हा तुम्हाला एचडी आयकॉन दिसेल, ज्याच्या मदतीने एचडी फोटो आणि व्हिडीओ स्टेट्स शेअर करता येतील. व्हॉट्सॲपच्या एचडी स्टेट्सची सुविधा बीटा व्हर्जनमध्ये उपलब्ध आहे. सध्या याचा वापर बीटा टेस्टर करू शकतात. परंतु लवकरच हे फीचर सामान्य युजर्ससाठी उपलब्ध होईल, अशी अपेक्षा आहे.

कसं वापरायचं एचडी फोटो-व्हिडीओ शेअरिंग फीचर

▮ सर्वप्रथम तुम्हाला व्हॉट्सॲपचं बीटा व्हर्जन डाऊनलोड करावं लागेल. गुगल प्ले स्टोअरवरून व्हॉट्सॲपचं बीटा व्हर्जन डाऊनलोड करता येतं.

▮ यासाठी प्ले स्टोअरवर व्हॉट्सॲप पेज स्क्रोल डाऊन करा. त्यानंतर बीटा टेस्टर सेक्शनमध्ये जा.

▮ पुढे जॉईन ऑप्शनवर क्लिक करा.

▮ बीटा टेस्टरनंतर अपडेट आणि त्याची उपलब्धता चेक करा.

▮ त्यानंतर व्हॉट्सॲप अपडेट करून ओपन करा.

▮ अपडेट झाल्यावर नेहमीप्रमाणे तुमचे फोटोज किंवा व्हिडीओ स्टेट्सला शेअर करा आणि शेअर करताना 'एचडी' ऑप्शन निवडा.

नोट - जर तुम्ही बीटा टेस्टर नसाल तर सध्या तुम्हाला एचडी फोटो आणि व्हिडीओ स्टेटस शेअरिंग ऑप्शनसाठी थोडी वाट पाहावी लागेल. जेव्हा हे फीचर लाइव्ह होईल, तेव्हा तुमच्या व्हॉट्सॲपमध्ये उपलब्ध होईल. यासाठी सिम्पल व्हॉट्सॲप अपडेट करावं लागेल, म्हणजे तेव्हा बीटा टेस्टर बनण्याची गरज नसेल.

अळशीचे सात आरोग्यदायी फायदे

पूर्वीपासूनच आहारात अळशीचा समावेश करण्याची आपली परंपरा आहे. अळशीत व्हिटॅमिन बी १, प्रोटीन, मॅग्नेशियम, ओमेगा-३ फॅटी ॲसिड ही पोषकतत्त्वे मुबलक प्रमाणात असतात. त्यामुळे आरोग्यास काय फायदा होतो जाणून घेऊया...



▮ अळशीमध्ये ओमेगा फॅटी ॲसिड आणि फायबर्स भरपूर प्रमाणात असतात. त्यामुळे मधुमेह, कॅन्सर आणि हृदयविकाराचा धोका कमी होतो.

▮ अळशीच्या सेवनाने ब्रेस्ट कॅन्सर आणि कोलोरेक्टल कॅन्सर होण्याची संभावना कमी होते. अळशीत ओमेगा-३ फॅटी ॲसिड मुबलक प्रमाणात असल्याने ट्युमर होण्यापासून आणि वाढण्यापासून संरक्षण होते.

▮ अळशीच्या सेवनाने कोलेस्ट्रॉल नियंत्रित राहते. लावा स्टेट युनिव्हर्सिटीच्या न्यूट्रीशन डिपार्टमेंट रिसर्चनुसार असे सिद्ध झाले आहे की, शरीरातील कोलेस्ट्रॉलची मात्रा कमी करण्यासाठी अळशी उपयुक्त ठरते.

▮ मासिक पाळीत होणाऱ्या त्रासावर अळशी फायदेशीर ठरते. ▮ अळशीमुळे ब्लड शुगर नियंत्रित राहते. ▮ अळशीमुळे वजन नियंत्रित राहण्यास मदत होते.

या घरगुती उपचारांनी केस बनवा चमकदार

वर्षातील प्रत्येक बदलत्या ऋतूमध्ये केसांची देखभाल करण्याची पद्धत देखील बदलावी लागते. उन्हाळा असो किंवा पावसाळा, प्रत्येक ऋतूमध्ये आपल्या केसांची निगा घ्यायला हवी. त्याकरिता आपण सर्वच जण आपापल्या परीने प्रयत्न करत असतो. कधी महागडे शाम्पू वापरून, तर कधी ब्यूटी पार्लरमधील महागड्या हेअर स्पा ट्रीटमेंट घेऊन, तर कधी परंपरेने चालत आलेले उपाय अमलात आणून, आपण आपल्या केसांची योग्य निगा राखण्याचा प्रयत्न करत असतो. पण आजकाल बदलते हवामान, प्रदूषण, केसांसाठी वापरली जाणारी रसायनयुक्त प्रसाधने वापरल्याने केस अकाली पांढरे होणे, गळणे इत्यादी तक्रारी उद्भवतात. या तक्रारी दूर करण्यासाठी आणि केस नेहमी सुंदर आणि चमकदार दिसण्यासाठी काही घरगुती उपाय करून बघता येतील.



कांद्याचा रस : कांद्याच्या रसामध्ये सल्फर मोठ्या प्रमणात असते. सल्फरमुळे कोलाजेन वाढून केसांची वाढ चांगली होण्यास मदत मिळते. हा उपाय करण्याकरता एक कांदा किसून तो पिळून घ्यावा. हा रस दहा मिनिटे केसांच्या मुळांशी लावून ठेवावा. त्यानंतर केस कोमट पाण्याने आणि शाम्पूने स्वच्छ धुवावेत. कांद्याच्या रसाचा वास केसांमधून निघाला नाही, असे वाटत असल्यास पुन्हा एकदा हलका शाम्पू वापरावा. कांद्याच्या रसाप्रमाणेच बटाट्याचा रसही केसांसाठी चांगला आहे. बटाटा किसून घेऊन पिळून घ्यावा आणि तो रस केसांना लावावा. दहा मिनिटांनी केस धुऊन टाकावेत.

नारळाचे दूध : नारळाच्या दुधामध्ये लोह, पोटॅशियम आणि फॅट्सची मात्र असते. या तीनही गोष्टी केसांसाठी अतिशय उत्तम आहेत. मात्र केसांना लावण्यासाठी ताजा नारळ खवून त्याचे दूध काढून घ्यावे. बाजारातून आणलेले तयार नारळाचे दूध शक्यतो वापरू नये. नारळाच्या दुधामध्ये अर्ध्या लिंबाचा रस घालावा आणि तीन-चार थेंब लॅव्हेंडरचे तेल घालावे. हे मिश्रण चार ते पाच तासांसाठी केसांना लावून ठेवावे. त्यानंतर कोमट पाण्याने आणि शाम्पूने केस धुवावेत.

आवळा : आवळा केसांकरिता अतिशय फायदेशीर आहे. यामध्ये असलेले 'क' जीवनसत्त्व केसांच्या आरोग्याकरिता अतिशय लाभकारी आहे. केसांना लावण्याकरिता आवळ्याचे तुकडे करून ते वाळवावेत, आणि त्याची पूड करावी. आवळ्याची तयार पूड बाजारातही उपलब्ध आहे, तिचाही वापर करता येईल. दोन लहान चमचे आवळ्याची पूड घेऊन त्यामध्ये दोन चमचे लिंबाचा रस घालावा. हे मिश्रण केसांना लावावे, व ते वाळेपर्यंत केसांवर राहू द्यावे. त्यानंतर शाम्पू आणि कोमट पाणी वापरून केस धुवावेत.



ॲपल सायडर व्हिनेगर : ॲपल सायडर व्हिनेगरमुळे केसांचा PH स्तर नियंत्रित राहतो. जर केस लांब असतील, तर एक लिटर पाण्यामध्ये ७५ मिलीलिटर ॲपल सायडर व्हिनेगर घालावे आणि केस लहान असतील, तर एक कप कोमट पाण्यामध्ये १५ मिलीलिटर सायडर व्हिनेगर घालावे. शाम्पूने केस धुतल्यानंतर सगळ्यात शेवटी या पाण्याने केस धुवावेत. यामुळे केस चमकदार होतीलच, शिवाय केसांची लांबी वाढण्यासही मदत होईल.

अंड्यातील पांढरा भाग : अंड्यातील पांढरा भाग केसांसाठी लाभकारी असतो. यामध्ये प्रथिने, सल्फर, लोह, झिंक, सेलेनियम, आयोडीन आणि फॉस्फरस असल्याने केसांच्या वाढीकरिता याचा चांगला उपयोग होतो. अंड्यातील पांढरा भाग एका भांड्यामध्ये काढून चांगला फेटून घ्यावा. यामध्ये एक लहान चमचा ऑलिव्ह ऑईल घालावे. ऑलिव्ह ऑईलऐवजी ग्रेपसीड ऑईल किंवा लॅव्हेंडर ऑईलही वापरता येईल. या मिश्रणामध्ये एक लहान चमचा मध घालून हे मिश्रण चांगले फेटून घ्यावे आणि आपल्या केसांना वीस मिनिटे लावून ठेवावे. त्यानंतर थंड पाण्याने व शाम्पूने केस धुवावेत. अंड्यातील पांढरा भाग केसांसाठीच नाही, तर त्वचेसाठी देखील अतिशय चांगला आहे.

मेथी : मेथीचे दाणे किंवा मेथ्या केसांचा नैसर्गिक रंग टिकवून ठेवण्यास मदत करतात. यामध्ये असलेली प्रथिने आणि निकोटिनिक ॲसिड केसांकरिता अतिशय फायदेशीर आहेत. मेथी दाणे केसांकरिता वापरण्यासाठी मेथी दाणे काही तास थोड्याशा पाण्यामध्ये भिजवून ठेवावेत. पाण्यामध्ये ठेवल्याने मेथी दाणे फुगतात. त्यानंतर हे मेथी दाणे मिक्सरवर वाटू घेऊन त्याची पेस्ट बनवून घ्यावी. या पेस्टमध्ये थोडेसे खोबरेल तेल मिसळावे आणि हे मिश्रण केसांना अर्धा तास लावून ठेवावे. त्यानंतर केस शाम्पूने धुऊन टाकावेत. मेथी दाण्यांमुळे केसांचे आरोग्य आणि नैसर्गिक रंग टिकून राहण्यास मदत मिळते.

ग्रीन टी : आपले आरोग्य सांभाळण्याकरिता आपण ग्रीन टीचा वापर करत असतो. हा ग्रीन टी आपल्या एकंदर आरोग्याकरताच नव्हे, तर केसांकरताही चांगला आहे. ग्रीन टीमध्ये अँटी ऑक्सिडंट्स मुबलक मात्रेमध्ये असतात. यामुळे केस चमकदार तर होतीलच, शिवाय केसांच्य मुळांना पोषण मिळून केस गळण्याचे प्रमाणही कमी होते. ग्रीन टी केसांकरता वापरण्यासाठी ग्रीन टी कोमट करून केसांना तासभर लावून ठेवावे. त्यानंतर थंड पाण्याने केस धुऊन टाकावेत.

बागेतले औषध
गवती चहा

आले आणि गवती चहा घालून केलेला चहा अनेक छोट्या-मोठ्या तक्रारींवरचा रामबाण उपाय आहे. सर्दी, डोकेदुखी, अंगातली बारीक कणकण घालवण्यासाठी हा सर्वोत्तम उपाय म्हणावा लागेल. गवती चहाला पातीचा चहा असेदेखील म्हणतात. याला एक विशिष्ट सुगंध असतो. घाम येऊन तापाचा निचरा होण्यासाठी गवती चहा विशेष गुणकारी आहे. गवती चहा, सुंठ, मिरे आणि दालचिनी यांचा अष्टमांश काढा घेतल्याने सर्दी-पडसे, थंडी वाजून ताप येणे आदी विकार नाहीसे होतात. तापात घाम येण्यासाठी गवती चहाचा वाफारा दिला जातो. हा वाफारा घेतल्यास ताप झटक्यात कमी होतो आणि अंगदुखी थांबते. गवती चहापासून तेलही काढतात. हे तेल संधिवात आणि वाताने अंग दुखण्यावर अत्यंत गुणकारी आहे. हे दुखणे असणाऱ्या व्यक्तींनी सकाळ-संध्याकाळ गवती चहाच्या तेलाने मालीश केल्यास संधिवात बरा होतो, अंगदुखी थांबते. गवती चहा कॉलराचा प्रतिबंध करण्यासाठीदेखील वापरला जातो.



प्रसन्न राहण्यासाठी करा 'हे' उपाय

अनेक जण दैनंदिन कामांमुळे थकून जातात. या थकव्यावर नेमका काय उपाय करावा हे न कळल्याने मग हा त्रास अंगावर काढला जातो. पण रोजची कामे करताना प्रसन्न राहणे शक्य आहे. त्यासाठी काही गोष्टींत नियमितता ठेवल्यास हे नक्कीच साध्य होऊ शकते. वजन कमी करणे, ताकद वाढवणे, शरीराची लवचिकता वाढवणे, त्वचा टवटवीत ठेवणे, त्याचबरोबर मन प्रसन्न ठेवणे व आरोग्याची काळजी घेणे ही काळाची गरज आहे. दिवसातील सर्वाधिक काळ घराबाहेर असल्याने आपण ताजेतवाने राहण्यासाठी योग, प्राणायाम आणि ध्यान यांची नक्कीच मदत घेऊ शकतो. योग या गोष्टीकडे आजही फक्त व्यायाम प्रकार म्हणून पाहिले जाते. पण प्रत्यक्षात त्याही पलीकडे जात योग हा यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, समाधी या आठ गोष्टींनी मिळून बनलेला आहे. योगाभ्यासात 'जीवनशैली कशी असावी' हे समजावले आहे. यामुळे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते. यामुळे मानसिक आणि शारीरिक आरोग्य निरोगी राहण्यास मदत होते. योगाचे विविध प्रकार, प्राणायाम, सात्त्विक आहार, ध्यान याने जीवन सुखकर होते. योगासनांमुळे जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन तयार होतो. मन स्थिर होण्यास मदत होते. मनाची चंचलता, नकारात्मकता कमी होते. त्यामुळे २१व्या शतकातील ताणतणावांना आणि स्पर्धेला सामोरे जाण्यासाठी याचा चांगला उपयोग होतो.



योग : योगासने योगाचा एक अष्टमांश भाग आहे. योग म्हणजे चित्त वृत्तीचा निरोध करणे. वृत्ती म्हणजे काय? त्यावर नियंत्रण ठेवायचे म्हणजे याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

प्राणायाम (श्वसनाचा व्यायाम) : प्राण म्हणजे जीवन शक्ती, आयाम म्हणजे तिला नियंत्रित करणे, श्वासाची गती जर कमी केली तर आयुष्य तेवढे जास्त. ही श्वासाची गती जर कमी करायची असेल तर प्राणायाम करणे गरजेचे आहे. श्वास कसा घ्यावा, संथ श्वसन, दीर्घ श्वसन कसे करावे, कोणी व कधी करावे याला महत्त्व आहे. प्रत्येक व्यक्तीसाठी प्राणायाम वेगवेगळे असतात. आपले शरीर अन्न, पाणी याशिवाय काही काळ राहू शकते, पण प्राणवायूशिवाय नाही. जसे व्यायामाने शरीरावर सकारात्मक बदल घडतात तसेच प्राणायामामुळे शरीर, मन आत्मा यामध्ये सकारात्मक बदल घडून ते बळकट होतात.

आहार : आपण काय खातो, कसे व केव्हा खातो, याला जीवनशैलीमध्ये महत्त्व असायला हवे. कारण खाण्याचा शरीरावर तसेच मन व विचारांवर परिणाम होतो. जसे अन्न घेऊ तसे विचार घडत जातात. यामुळे आहारालासुद्धा तितकेच महत्त्व असायला हवे. आपण कुठल्या प्रदेशात राहतो, राज्य कोणते, तिथले हवामान कसे आहे, यावरून आपला आहार ठरतो. विज्ञानाची प्रगती माणसाला सुखी करण्यासाठी होत आहे. पण त्याच्या अयोग्य वापरामुळे मानव अधिक तणावपूर्वक आयुष्य जगत आहे. जग जास्त जवळ आले, माणसातील संवाद वाढले, लोक एकमेकांशी जोडले गेले. जवळची माणसे लांब व लांबचे लोक जवळ आले. माणसांचे त्रास वाढले, कष्ट कमी झाले, पण माणूस असमाधानी होत गेला. मनावरील ताण वाढला व त्याचा परिणाम शरीरावर, वाढते वजन, गुडघेदुखी, डोकेदुखी, पाठदुखी अशा छोट्या त्रासापासून मधुमेह, उच्च रक्तदाब, कॅन्सर, त्वचेचे रोग, अल्सर, ॲसिडिटी असे अनेक विकार जडत जातात. म्हणजेच प्रत्येक व्याधीला 'मन' कारणीभूत असल्याचे दिसते. या सर्व त्रासासाठी आहार, विहार, व्यायाम, विचार यात बदल करणे आवश्यक असून योगाभ्यास हा या सगळ्यावरील उत्तम उपाय ठरू शकतो.

संपादकीय

शेतकऱ्यांना कर्जमाफीचा दिलासा मिळणार?



संपादक दिपक मोरेश्वर नाईक



महायुती सरकारने शेतकऱ्यांची कर्जमाफी उच्चाधिकार समिती स्थापन केली; या आधीही शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी समित्या स्थापन केल्या. मात्र समित्यांचा अहवाल गुलदस्त्यात राहिला आहे. अहवालानंतर शेतकरी कर्जमुक्त होईल का? राज्यात सुमारे ९५ लाखांहून अधिक शेतकरी बांधव आहेत. बळीराजा हा जगाचा पोशिंदा, परंतु याच शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न आजही न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. यापैकी एक म्हणजे कर्जमाफी. माजी मंत्री बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी आंदोलनांचे हत्यार उपसले आणि अखेर महायुती सरकारने शेतकऱ्यांची कर्जमाफी उच्चाधिकार समिती स्थापन केली. मात्र शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी नेमलेली ही समिती पहिली समिती आहे असे नाही. या आधीही शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी समित्या स्थापन केल्या. मात्र या समित्यांचा अहवाल आजही गुलदस्त्यात राहिला आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांचे आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितीच्या अहवालानंतर शेतकरी कर्जमुक्त होईल का, हे पुढील सहा महिन्यांनी स्पष्ट होईलच.

शेतकऱ्यांची कर्जमाफी ही मागणी काही एका रात्रीच उगम पावली असे नाही. शेतकऱ्यांची कर्जमाफी हा मुद्दा राजकीय नेत्यांनी कायमच लावून धरला आहे. निवडणुका जवळ आल्या की, शेतकऱ्यांची कर्जमाफी, दजेर्दार आरोग्य सुविधा, खड्डेमुक्त रस्ते हे विषय सत्ताधारी असो वा विरोधक लावून धरतात. माजी मंत्री बच्चू कडू यांनी कर्जमाफीसाठी आंदोलनाचे हत्यार उपसले आणि राज्य सरकार खडबडून जागे झाले. तातडीने उच्चाधिकार समिती स्थापन करत ३० जून २०२६ पर्यंत अहवाल सादर करण्याचे निर्देश समितीला दिले. समितीचा अहवाल काय असेल तो असेल परंतु शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी स्थापन केलेली ही समिती पहिलीच आहे का, याधीच्या समितींनी दिलेल्या अहवालाचे काय, असा प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांचे आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी होणार की, नंतर सगळं थंडबस्त्यात जाणार, हे पुढील काही महिन्यांत स्पष्ट होईलच. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची आर्थिक अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. कर्जबाजारीपणा, अवकाळी पाऊस, बाजारभावातील अस्थिरता आणि विमा योजनांतील अकार्यक्षमता या साऱ्यामुळे शेतकरी आत्महत्यांच्या घटना थांबत नाहीत.

या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा अभ्यास करण्यासाठी मित्राचे संस्थापक अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे. या समितीचा उद्देश ''शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी शाश्वत आराखडा'' तयार करणे, असे सांगण्यात आले. मात्र शेतकऱ्यांच्या मनात आजही तीव्र नाराजी असून यापूर्वीही अशाच अनेक समित्या स्थापन होऊन त्यांचा अहवाल धूळखात पडला आहे. त्यामुळे परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितीच्या अहवालाचा शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी उपयोग होतो की या समितीचा हा अहवाल गुलदस्त्यात राहणार की शेतकरी हिताचा हे ३० जून २०२६ पर्यंत स्पष्ट होईलच.

सरकारच्या या समित्या म्हणजे फसवे आश्वासनांचा मुखवटा. कर्जमाफीसाठी कोणत्याही ठोस निर्णयाऐवजी 'अभ्यास समिती' नेमण्यामागे उद्देश फक्त वेळकाढूपणा आणि निवडणुकीपूर्व राजकीय प्रतिमा वाचविणे हा आहे. प्रवीण परदेशी यांच्या नेतृत्वाखालील समिती शेतकऱ्यांना खरी मदत करेल का, की आणखी एका अहवालापुरतीच मर्यादित राहील, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. याआधीही अनेक उच्चाधिकार समित्यांचे अहवाल मंत्रिमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आले. मात्र आजही त्या अहवालाचे काय झाले हे गुलदस्त्यातच आहे. सरकारला जर खरोखर शेतकऱ्यांना दिलासा द्यायचा असेल, तर समित्या नव्हे तर थेट धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज आहे. शेतकऱ्यांची कर्जमुक्ती, शेतीमालाला हमीभाव, विमा दाव्यांची जलद निकाली प्रक्रिया आणि नैसर्गिक आपत्तीतील नुकसानभरपाई या मुद्द्यांवर प्रत्यक्ष कृती झाली पाहिजे. पण त्याऐवजी उच्चाधिकार समिती स्थापन करून सरकारने शेतकऱ्यांची बोळवण तर केली नाही ना, उच्चाधिकार समिती स्थापन अहवाल गुलदस्त्यात तर विरोधकांना टीका करण्यासाठी आयते कोलीत मिळणार यात दुमत नाही.

एकूणच महायुती सरकारने शेतकऱ्यांच्या समस्येकडे आगामी निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून राजकीय चष्म्यातून पाहणे थांबवून तत्काळ अंमलबजावणीच्या पातळीवर कार्यवाही करणे गरजेचे आहे. अन्यथा या 'उच्चाधिकार समित्या' म्हणजे शेतकऱ्यांच्या वेदनांवर मीठ चोळल्यासारखे ठरेल आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्यांमध्ये असंतोष आणखी वाढेल. शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली जाऊ शकते की नाही याचे ज्ञान सत्ताधारी असो वा विरोधक दोघांना अवगत आहे. त्यामुळे आगामी निवडणुका लक्षात घेता समिती स्थापन करून पुन्हा एकदा शेतकऱ्यांना गाजर तर दाखवले नाही ना, असा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवर निर्णय घेणे सत्ताधारी असो वा विरोधक दोघांच्याही विचारावर ठरणार आहे. त्यामुळे परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या या समितीचा अहवाल वेळोवर येईल अशी शक्यता कमीच आहे. शेतकऱ्यांना दिलासा देणारे निर्णय कागदावर राहतात आणि प्रत्यक्ष मदत शेतकऱ्यांच्या हातात पोहोचत नाही. त्यामुळे या समितीच्या स्थापनेने केवळ राजकीय गाजावाजा केला जात आहे. परंतु प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या जीवनात काही बदल होईल असे दूरवर दिसूत येत नाही. त्यामुळे समिती स्थापन करून शेतकऱ्यांची बोळवण केली तर भविष्यात शेतकऱ्यांच्या सहनशीलतेचा उद्रेक होईल आणि याला सत्ताधारी व विरोधक जबाबदार असणार यात दुमत नाही. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची अवस्था दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. कधी दुष्काळ, कधी अतिवृष्टी, कधी अवकाळी पाऊस अशा संकटांच्या चक्रव्यूहात अडकलेला शेतकरी हवालदिल झाला आहे. शेती ही जीवनाचा कणा असूनही, शेतकऱ्याला स्थैर्य देण्यात सरकारचे युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. गेल्या काही वर्षांत शेतकऱ्यांनी उत्पादन वाढवण्यासाठी खूप परिश्रम घेतले, परंतु शेतीमालाला बाजारभाव न मिळाल्याने त्यांची आर्थिक घडी विस्कटली आहे. पीक विमा योजनांच्या अंमलबजावणीत विलंब, बँकांचे कर्ज वसुलीचे दडपण, तसेच वाढते खत-औषधांचे दर ही संकटे अधिक तीव्र बनवत आहेत. त्यातच हवामान बदलामुळे पिकांची अनिश्चितता वाढली आहे. आज ग्रामीण भागात अनेक शेतकरी जगण्याची लढाई लढत आहेत.

आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांची आकडेवारी हे केवळ आकडे नसून, त्यामागे उद्ध्वस्त झालेली कुटुंबे आणि तुटलेल्या स्वप्नांची कहाणी दडलेली आहे. सरकारकडून मदतीच्या घोषणा होतात, परंतु त्या प्रत्यक्षात पोहोचायला वेळ लागतो. महाराष्ट्रातील शेतकऱ्याला खऱ्या अर्थाने दिलासा मिळावा, यासाठी स्थिर व हमीभावाची धोरणे, वेळेवर विमा परतावा, तसेच कर्जमाफीसोबत शाश्वत शेतीसाठी तंत्रज्ञानाचा वापर आणि बाजारपेठेतील थेट प्रवेश आवश्यक आहे.

ज्यात सुमारे ९५ लाखांहून अधिक शेतकरी बांधव आहेत. बळीराजा हा जगाचा पोशिंदा, परंतु याच शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न आजही न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. यापैकी एक म्हणजे कर्जमाफी. माजी मंत्री बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी आंदोलनांचे हत्यार उपसले आणि अखेर महायुती सरकारने शेतकऱ्यांची कर्जमाफी उच्चाधिकार समिती स्थापन केली. मात्र शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी नेमलेली ही समिती पहिली समिती आहे असे नाही. या आधीही शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी समित्या स्थापन केल्या. मात्र या समित्यांचा अहवाल आजही गुलदस्त्यात राहिला आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांचे आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितीच्या अहवालानंतर शेतकरी कर्जमुक्त होईल का, हे पुढील सहा महिन्यांनी स्पष्ट होईलच.

शेतकऱ्यांची कर्जमाफी ही मागणी काही एका रात्रीच उगम पावली असे नाही. शेतकऱ्यांची कर्जमाफी हा मुद्दा राजकीय नेत्यांनी कायमच लावून धरला आहे. निवडणुका जवळ आल्या की, शेतकऱ्यांची कर्जमाफी, दजेर्दार आरोग्य सुविधा, खड्डेमुक्त रस्ते हे विषय सत्ताधारी असो वा विरोधक लावून धरतात. माजी मंत्री बच्चू कडू यांनी कर्जमाफीसाठी आंदोलनाचे हत्यार उपसले आणि राज्य सरकार खडबडून जागे झाले. तातडीने उच्चाधिकार समिती स्थापन करत ३० जून २०२६ पर्यंत अहवाल सादर करण्याचे निर्देश समितीला दिले. समितीचा अहवाल काय असेल तो असेल परंतु शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी स्थापन केलेली ही समिती पहिलीच आहे का, याधीच्या समितींनी दिलेल्या अहवालाचे काय, असा प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांचे आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी होणार की, नंतर सगळं थंडबस्त्यात जाणार, हे पुढील काही महिन्यांत स्पष्ट होईलच. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची आर्थिक अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. कर्जबाजारीपणा, अवकाळी पाऊस, बाजारभावातील अस्थिरता आणि विमा योजनांतील अकार्यक्षमता या साऱ्यामुळे शेतकरी आत्महत्यांच्या घटना थांबत नाहीत. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा अभ्यास करण्यासाठी मित्राचे संस्थापक अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे. या समितीचा उद्देश ''शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी शाश्वत आराखडा'' तयार करणे, असे सांगण्यात आले. मात्र शेतकऱ्यांच्या मनात आजही तीव्र नाराजी असून यापूर्वीही अशाच अनेक समित्या स्थापन होऊन त्यांचा अहवाल धूळखात पडला आहे. त्यामुळे परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितीच्या अहवालाचा शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी उपयोग होतो की या समितीचा हा अहवाल गुलदस्त्यात राहणार की शेतकरी हिताचा हे ३० जून २०२६ पर्यंत स्पष्ट होईलच.

सरकारच्या या समित्या म्हणजे फसवे आश्वासनांचा मुखवटा. कर्जमाफीसाठी कोणत्याही ठोस निर्णयाऐवजी 'अभ्यास समिती' नेमण्यामागे उद्देश फक्त वेळकाढूपणा आणि निवडणुकीपूर्व राजकीय प्रतिमा वाचविणे हा आहे. प्रवीण परदेशी यांच्या नेतृत्वाखालील समिती शेतकऱ्यांना खरी मदत करेल का, की आणखी एका अहवालापुरतीच मर्यादित राहील, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. याआधीही अनेक उच्चाधिकार समित्यांचे अहवाल मंत्रिमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आले. मात्र आजही त्या अहवालाचे काय झाले हे गुलदस्त्यातच आहे. सरकारला जर खरोखर शेतकऱ्यांना दिलासा द्यायचा असेल, तर समित्या नव्हे तर थेट धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज आहे. शेतकऱ्यांची कर्जमुक्ती, शेतीमालाला हमीभाव, विमा दाव्यांची जलद निकाली प्रक्रिया आणि नैसर्गिक आपत्तीतील नुकसानभरपाई या मुद्द्यांवर प्रत्यक्ष कृती झाली पाहिजे. पण त्याऐवजी उच्चाधिकार समिती स्थापन करून सरकारने शेतकऱ्यांची बोळवण तर केली नाही ना, उच्चाधिकार समिती स्थापन अहवाल गुलदस्त्यात तर विरोधकांना टीका करण्यासाठी आयते कोलीत मिळणार यात दुमत नाही.

एकूणच महायुती सरकारने शेतकऱ्यांच्या समस्येकडे आगामी निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून राजकीय चष्म्यातून पाहणे थांबवून तत्काळ अंमलबजावणीच्या पातळीवर कार्यवाही करणे गरजेचे आहे. अन्यथा या 'उच्चाधिकार समित्या' म्हणजे शेतकऱ्यांच्या वेदनांवर मीठ चोळल्यासारखे ठरेल आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्यांमध्ये असंतोष आणखी वाढेल. शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली जाऊ शकते की नाही याचे ज्ञान सत्ताधारी असो वा विरोधक दोघांना अवगत आहे. त्यामुळे आगामी निवडणुका लक्षात घेता समिती स्थापन करून पुन्हा एकदा शेतकऱ्यांना गाजर तर दाखवले नाही ना, असा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवर निर्णय घेणे सत्ताधारी असो वा विरोधक दोघांच्याही विचारावर ठरणार आहे. त्यामुळे परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या या समितीचा अहवाल वेळोवर येईल अशी शक्यता कमीच आहे. शेतकऱ्यांना दिलासा देणारे निर्णय कागदावर राहतात आणि प्रत्यक्ष मदत शेतकऱ्यांच्या हातात पोहोचत नाही. त्यामुळे या समितीच्या स्थापनेने केवळ राजकीय गाजावाजा केला जात आहे. परंतु प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या जीवनात काही बदल होईल असे दूरवर दिसूत येत नाही. त्यामुळे समिती स्थापन करून शेतकऱ्यांची बोळवण केली तर भविष्यात शेतकऱ्यांच्या सहनशीलतेचा उद्रेक होईल आणि याला सत्ताधारी व विरोधक जबाबदार असणार यात दुमत नाही.

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची अवस्था दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. कधी दुष्काळ, कधी अतिवृष्टी, कधी अवकाळी पाऊस अशा संकटांच्या चक्रव्यूहात अडकलेला शेतकरी हवालदिल झाला आहे. शेती ही जीवनाचा कणा असूनही, शेतकऱ्याला स्थैर्य देण्यात सरकारचे युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. गेल्या काही वर्षांत शेतकऱ्यांनी उत्पादन वाढवण्यासाठी खूप परिश्रम घेतले, परंतु शेतीमालाला बाजारभाव न मिळाल्याने त्यांची आर्थिक घडी विस्कटली आहे. पीक विमा योजनांच्या अंमलबजावणीत विलंब, बँकांचे कर्ज वसुलीचे दडपण, तसेच वाढते खत-औषधांचे दर ही संकटे अधिक तीव्र बनवत आहेत. त्यातच हवामान बदलामुळे पिकांची अनिश्चितता वाढली आहे.

आज ग्रामीण भागात अनेक शेतकरी जगण्याची लढाई लढत आहेत. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांची आकडेवारी हे केवळ आकडे नसून, त्यामागे उद्ध्वस्त झालेली कुटुंबे आणि तुटलेल्या स्वप्नांची कहाणी दडलेली आहे. सरकारकडून मदतीच्या घोषणा होतात, परंतु त्या प्रत्यक्षात पोहोचायला वेळ लागतो. महाराष्ट्रातील शेतकऱ्याला खऱ्या अर्थाने दिलासा मिळावा, यासाठी स्थिर व हमीभावाची धोरणे, वेळेवर विमा परतावा, तसेच कर्जमाफीसोबत शाश्वत शेतीसाठी तंत्रज्ञानाचा वापर आणि बाजारपेठेतील थेट प्रवेश आवश्यक आहे.

सोन्यात गुंतवणूक करण्याचा हाच सुवर्णकाळ



सोन्याच्या दरात होत असलेली घट ही गुंतवणूकदारांसाठी डोकेदुखी ठरत आहे. तुम्ही सोन्याची खरेदी दीर्घकालीन गुंतवणूक म्हणून केली असेल तर घाबरण्याचे कारण नाही. पण जर तुम्ही अल्पकालीन होत असलेला नफा पाहून यात गुंतवणूक केली असेल तर संयम बाळगण्याची आवश्यकता आहे. जागतिक स्तरावर घडत असलेल्या घडामोडी पाहता सोन्याच्या दरांचा आलेख हा चढताच राहील, असे संकेत मिळत आहेत. सध्या सोन्याच्या दरात होत असलेल्या चढउताराचे विश्लेषण हे ह्यहेल्दी करेक्शनह्ण असे केले जात आहे. त्यामुळे चांगल्या गुंतवणूकदारांसाठी सोन्यात गुंतवणूक करण्याचा हाच सुवर्णकाळ आहे. विक्रमी पातळीवर गेलेले सोन्याचे दर घसरू लागले आहेत. येत्या काही काळात सोन्याच्या दरात होणारी घसरण काही प्रमाणात अशीच सुरू राहणार आहे. दिवाळीमध्ये सोन्याचा दर विक्रमी पातळीवर असतानाही भारतीयांनी सोने खरेदीत कुठेही हात आखडता घेतला नाही. सीएनबीसीच्या एका रिपोर्टनुसार, यंदाच्या दिवाळीत भारतीयांनी ११ अब्ज डॉलर्सचे सोने खरेदी केले आहे. हा आकडा भारतीयांचा सोन्याच्या गुंतवणुकीवरील असलेला विश्वास दर्शवत आहे. पण अचानक सोन्याच्या दरात होत असलेली घट अनेक किरकोळ गुंतवणूकदारांसाठी चिंतेची बाब बनली आहे. सोनं हे भारतीय संस्कृतीचं आणि अर्थव्यवस्थेचं अविभाज्य अंग आहे. पारंपरिक दृष्टिकोनातून सोनं हे केवळ अलंकारांसाठी नाही, तर संपत्ती, सुरक्षितता आणि प्रतिष्ठेचं प्रतीक आहे. प्रत्येक भारतीय घरात सोन्याचं स्थान वेगळं आहे. विवाहसोहळ्यांपासून ते सणवारांपर्यंत, सोन्याशिवाय समारंभ अपूर्ण वाटतो. परंतु, सोन्याचं महत्त्व केवळ भावनिक नाही, ते आर्थिकदृष्ट्याही अत्यंत प्रभावी आहे.

जागतिक स्तरावर घडर्णाया घडामोडींमुळे सोन्याच्या दरातील चढउतार अशीच सुरू राहणार असल्याचा अंदाज कमोडिटी मार्केट अभ्यासक आणि तज्ज्ञांनी वर्तवला आहे. पण सोन्याच्या दरात अचानक झालेली वाढ आणि आता सतत होत असलेली घट यामागचं कारण काय आहे, हे आपण समजून घेतलं पाहिजे. सोन्याचे दर हे किरकोळ बाजारातील मागणी आणि पुरवठ्यावर अवलंबून नसतात. हे दर अमेरिकेच्या कॉमेक्स म्हणजे न्यूयॉर्क स्थित असलेल्या कमोडिटी एक्सचेंजमधून जाहीर होतात. याआधी हे दर लंडनच्या बुलियन मार्केटमधून जाहीर होत असत. अमेरिकेत भाव जाहीर झाल्यानंतर त्याचा परिणाम भारताच्या एमसीएक्स म्हणजेच कमोडिटी मार्केटवर दुर्सया दिवशी दिसून येतो. त्यामुळे जागतिक कमोडिटी मार्केटवर अमेरिकेचा प्रभाव असल्याने सोन्याचे विश्लेषण करताना डॉलरला विशेष महत्त्व दिले जाते.

सध्या सोन्याच्या दरात होत असलेल्या घसरणीमागे अनेक महत्त्वाचे फॅक्टर आहेत. पण त्यातले दोन फॅक्टर सध्याच्या घसरणीला कारणीभूत आहेत. त्यामध्ये पहिला फॅक्टर म्हणजे २९ ऑक्टोबरला झालेली एक्सपायरी. कमोडिटी मार्केटमध्ये सोने हे कॉन्ट्रॅक्ट स्वरूपात विकले जाते. अमेरिकेच्या कॉमेक्समध्ये हे कॉन्ट्रॅक्ट दर महिन्याच्या २९ तारखेला एक्सपायर होतात. याचाच अर्थ सोन्याच्या खरेदी कराराची या महिन्याची मुदत २९ ऑक्टोबरला संपली आहे. त्यामुळे एक्सपायरी डेट जवळ आल्याने जागतिक बाजारात नफा वसुली झाल्याचे पाहायला मिळाले. ज्या गुंतवणूकदारांनी सोने हे कमी किमतीत खरेदी केले होते, त्यांनी ते सोने कॉन्ट्रॅक्ट संपण्याआधी विकून टाकले आणि आपला प्रॉफिट बूक केला. याचाच परिणाम म्हणून सोन्यात गेल्या आठवडाभरात घसरण दिसून आली. दुसरा फॅक्टर म्हणजे, अमेरिका आणि चीन यांच्यात सुरू असलेल्या बैठका. इथे हे समजून घेतलं पाहिजे की, अमेरिका आणि चीनमध्ये सुरू असलेल्या व्यापार युद्धामुळे सोन्याचे दर वाढत आहेत. जागतिक स्तरावर चीन हा सोन्याची खरेदी करणारा सर्वात मोठा प्लेअर आहे. तसेच जागतिक स्तरावर असलेली डॉलरची दादागिरी मोडून काढण्यासाठी चीन आटोकाट प्रयत्न करत आहे. अमेरिकेत राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे सरकार आल्यापासून चीन आणि अमेरिका यांच्यातील व्यापार युद्ध शिगेला पोहोचले आहे. अमेरिकेने चीनवर २०० टक्के टॅरिफ लावल्यानंतर चीननेही अमेरिकेला निर्यात होर्णाया दुर्मिळ आणि अतिशय महत्त्वाच्या खनिजांवर निर्यात बंदी लागू केली आहे. अमेरिकेत या खनिजांचा वापर अवकाश संशोधन साहित्य बनवण्यासाठी तसेच शस्त्र बनवण्यासाठी, इलेक्ट्रॉनिक गॅझेट बनवण्यासाठी होत असतो. पण चीनने जशास तसे उत्तर म्हणून या खनिजांच्या निर्यातीवर बंदी घातल्याने अमेरिका आणि चीन यांच्यातील संबंध अधिकच ताणले गेले आहेत आणि परिणामी ट्रम्प यांनी आणखी १०० टक्के टॅरिफ चीनवर लादण्याची धमकी दिली आहे. यामुळेच जागतिक स्तरावर पुन्हा अस्थिरता निर्माण झाल्याने मधल्या काळात सोन्याचे दर वाढल्याचे पाहायला मिळाले. याच पार्श्वभूमीवर अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांची ३० ऑक्टोबरला महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत दोन्ही देशांमध्ये सकारात्मक चर्चा झाल्याचे खुद्द डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितले. याशिवाय अमेरिकेने चीनवरील १० टक्के टॅरिफ कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे दोन्ही बलाढ्य राष्ट्रांमधील झालेली ही सकारात्मक चर्चा इक्विटी मार्केटसाठी चांगली बाब असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे याचा नकारात्मक परिणाम सोन्याच्या दरांवर होण्याची शक्यता आहे. येत्या काही काळात सोन्याच्या दरावर असाच दबाव राहण्याची शक्यता आहे. एकीकडे चीनसोबत अमेरिकेची सकारात्मक बैठक होत असली तरी दुसरीकडे भारतासोबतही अमेरिका व्यापारी धोरणांवरून वाटाघाटी करत आहे. रशियासोबतही अमेरिकेच्या बैठका सुरू आहेत. इतर दोन महत्त्वांच्या बैठकांमध्ये टॅरिफ वॉरवर निर्णय होणार आहे. त्यामुळे सोन्यामध्ये गुंतवणूक करणारे गुंतवणूकदार या बैठकांच्या निष्कर्षाची वाट पाहत आहेत. जर या बैठकांमध्ये अमेरिकेने टॅरिफबाबत तडजोड करण्याची भूमिका घेतली तर इक्विटी मार्केटसाठी ही चांगली बातमी असल्याने आपसूकच सोन्यातील गुंतवणूक काही प्रमाणात घटण्याची शक्यता आहे. याचाच परिणाम म्हणून गेल्या काही दिवसांपासून जागतिक स्तरावरील सोन्याच्या दरात ८.५ टक्के तर भारतीय सोन्याच्या बाजारात जवळपास ९ टक्के घसरण झाली आहे. अमेरिकेत सध्या सतत बदलत असलेल्या आर्थिक धोरणांमुळे अस्थिरता आहे. अशावेळी अमेरिकेतील एक लॉबी सतत सोने विकत आहे. तर या लॉबीचा भाग असलेले युरोपीय देश आणि जपानदेखील सोने विकत आहे. डॉलरचे वर्चस्व कायम राखण्यासाठी अमेरिकन लॉबीने सोन्याच्या बाजारात विक्रीचा धडाका लावला आहे. तर याउलट चीनने मात्र सोने खरेदी करण्यासाठी आपल्या तिजोरीची दारं उघडली आहेत. अनेक सेंट्रल बँकांनी गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणात सोन्याची खरेदी केली आहे. ट्रेडिंग इकोनोमिक्स या वेबसाईटनुसार, एकट्या चीनचा २०२५ च्या दुसऱ्या तिमाहीत सोन्याचा साठा अंदाजे २२९८.५३ टनांपर्यंत पोहोचला आहे. तर २०२५ च्या दुसऱ्या तिमाहीत भारतातील सोन्याचा साठा ८७९.६० टनांवरून ८८० टनांपर्यंत (१०० अब्ज डॉलर्स) वाढला आहे. दुसरीकडे रशिया-युक्रेन युद्ध हे थांबण्याचं नाव घेत नाहीये. अमेरिकेने सुरू केलेले टॅरिफ वॉरही इतक्यात थांबेल असे तज्ज्ञांना वाटत नाही. अशातच भूराजकीय अस्थिरता आणखी वाढण्याची शक्यता आहे. अमेरिकाने व्हेनेझुएलावर आक्रमण करण्याची तयारी केली आहे. चीन आणि तैवानमधील तणाव पुन्हा वाढू लागला आहे. त्यामुळे हे सर्व फॅक्टर्स बघता येत्या काळात सोन्याच्या दरात पुन्हा वाढ होण्याची शक्यता आहे. अर्थात सोन्याच्या दरात किती वाढ होईल याचे भाकित करणे कठीण आहे. पण येत्या काळात सोन्याचा आलेख चढताच राहील असा अंदाज वर्तवला जात आहे. किरकोळ गुंतवणूकदारांसाठी हा काळ अतिशय संभ्रमात टाकणारा आहे. दिवाळीनंतर सोन्याच्या दरात झालेली घट ही किरकोळ गुंतवणूकदारांसाठी चिंतेची बाब बनली आहे. अनेक मंडळींनी इक्विटी मार्केटमधून पैसे काढून सोन्यात गुंतवले आहेत. परंतु १७ ऑक्टोबरपासून सोन्याच्या दरात होत असलेली घट ही गुंतवणूकदारांसाठी डोकेदुखी ठरत आहे. तुम्ही सोन्याची खरेदी दीर्घकालीन गुंतवणूक म्हणून केली असेल तर घाबरण्याचे कारण नाही. पण जर तुम्ही अल्पकालीन होत असलेला नफा पाहून यात गुंतवणूक केली असेल तर संयम बाळगण्याची आवश्यकता आहे. जागतिक स्तरावर घडत असलेल्या घडामोडी पाहता सोन्याच्या दरांचा आलेख हा चढताच राहील, असे संकेत मिळत आहेत. सध्या सोन्याच्या दरात होत असलेल्या चढउताराचे विश्लेषण हे ह्यहेल्दी करेक्शनह्ण असे केले जात आहे. सतत एकाच दिशेने होणारी वाढ ही कुठेतरी विसावते आणि पुन्हा नवीन उंचवटा तयार करते याला ट्रेडिंगमध्ये ह्यहेल्दी करेक्शनह्ण म्हटले जाते. त्यामुळे एका चांगल्या गुंतवणूकदारांसाठी सोन्यात गुंतवणूक करण्याचा हाच सुवर्णकाळ आहे. सोन्यातील गुंतवणूक ही सर्वच काळात सुरक्षित गुंतवणूक म्हणून मानली जाते. गेल्या २० वर्षांचा अभ्यास केला तर सोन्यातील गुंतवणुकीला कायमच चांगला परतावा मिळाला आहे. सध्या सोन्याचे स्वरूप बदलले आहे. मागच्या काही वर्षांत सोन्याच्या दागिन्यांमधील गुंतवणुकीपेक्षा डिजिटल गोल्ड, ईटीएफमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक वाढली आहे. गोल्ड एसआयपी हा नवा पर्याय खुला झाल्याने अनेक तरुण गुंतवणूकदार दीर्घकाळासाठी सोन्यात पैसे गुंतवत आहेत. पण २०२० पासून सोन्यात सुरू झालेले चढउतार जेवढे गुंतवणूकदारांना आकर्षित करत आहेत, तेवढेच ते गुंतवणूकदारांसाठी जोखमीचेदेखील ठरत आहेत. २०२६ पर्यंत सोन्याच्या दरात आणखी २५ टक्के भाववाढ होण्याचा अंदाज वर्तवला जात आहे. त्यामुळे सध्या घसरण होत असली तरी सोन्यात आधीच गुंतवणूक केलेल्या गुंतवणूकदरांनी संयम बाळगण्याची आवश्यकता आहे.

पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

4

मुंबई, मंगळवार, ११ नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर २०२५

नोकरीसाठी कामगाराकडून बनावट प्रमाणपत्राचा जुगाड औष्णिक वीज केंद्रातील धक्कादायक प्रकार उघड

नाशिकरोड। एकलहरे औष्णिक वीज केंद्रात नोकरी मिळविलेल्या कामगाराने बनावट चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र सादर केल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. शहर पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांनी नागरिकांना तक्रारी करण्यासाठी उपलब्ध करून दिलेल्या व्हॉट्सॲप क्रमांकावर प्राप्त तक्रारीची नाशिकरोड पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक जितेंद्र सपकाळे यांनी केलेल्या चौकशीतून हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला.

संशयित भानुदास बहिरू ढोकणे (रा. न्यू सामनगाव, एकलहरे रोड) याच्या विरोधात पोलिस हवालदार विशाल साळुंखे यांनी दिलेल्या फियार्दीवरून महाराष्ट्र पोलिस, एकलहरे औष्णिक वीज निर्मिती केंद्र आणि शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संशयित भानुदास ढोकणे याने एकलहरे औष्णिक वीजनिर्मिती केंद्रात एस. एस. जी. इंजिनीअरिंग अँड कॉन्ट्रॅक्ट मार्फत नोकरी मिळविली होती. या कामासाठी पोलिस विभागाकडील आवश्यक असलेले चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र संशयित भानुदास ढोकणे याने सादर केलेले होते.

मात्र संशयित ढोकणे याच्या विरोधात माळेगाव, सिन्नर या पोलिस ठाण्यात फौजदारी गुन्हा दाखल असतानाही त्याने ही पोलिसांकडील चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र मिळवून ते सादर केलेले असल्याची तक्रार शहर पोलिस आयुक्तांनी उपलब्ध करून दिलेल्या व्हॉट्सॲप क्रमांकावर शहर पोलिसानं प्राप्त झाली होती.

या तक्रारीची गोपनीय शाखेचे पोलिस हवालदार विशाल साळुंखे यांच्या मार्फत शहानिशा केली असता, संशयित ढोकणे याने बनावट चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र सादर केल्याचा प्रताप उजेडात आला.



असा झाला पदार्फाश

प्रमाणपत्राक तफावत आढळल्याने पोलिसांनी संशयिताने एकलहरे औष्णिक वीज निर्मिती केंद्र येथे सादर केलेल्या चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्राची प्रत मागवली. त्यात युवराज पत्की यांच्याऐवजी भारतसिंग कालसिंग पराडके यांची डिजिटल स्वाक्षरी आढळून आली. त्याशिवाय प्रकरण क्रमांक, दिनांक, मजकूर, वास्तव्याचा कालावधी आणि शेरा आदीबाबींत फेरफार करून चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्राचे बनावटीकरण करून नोकरी मिळवली.

तो स्वतःला संपवणार होता, पोलिसांच्या सतर्कतेने जिंकले मन!

पुणे। सध्या सोशल मीडियावर पुण्यातील पोलिसांचा एक व्हिडीओ व्हायरल होताना दिसत आहे. हा व्हिडीओ पाहून अनेकांनी पुणे पोलिसांचे कौतुक केले आहे. व्हिडीओमध्ये पाहायला मिळते की एक वृद्ध व्यक्ती भांडणाला कंटाळून फाशी घेण्याचा प्रयत्न करत आहे. तेवढ्यात घटनास्थळी पोलिस पोहोचली. त्यांच्या सतर्कतेमुळे ज्येष्ठ नागरिकाचा जीव वाचला आहे. १ मिनिट १५ सेकंदांच्या या व्हायरल व्हिडीओत पोलिस घराचा दरवाजा तोडताना दिसत आहेत. व्हिडीओच्या सुमारे १६ व्या सेकंदाला पोलिस दरवाजा तोडून घरात प्रवेश करतात. त्यांना येथे एक व्यक्ती फाशीच्या फंद्याने लटकलेला दिसतो. त्यानंतर पोलीस कर्मचारी त्याला फंद्यातून खाली उतरवून जमिनीवर झोपवतात आणि त्याला CPR देण्यास सुरुवात करतात.

ही घटना पुणे जिल्ह्यातील महंमदवाडीच्या कृष्णानगर भागातील आहे. बुधवारी महंमदवाडी बीट मार्शल पोलीस नाईक बुधवारे आणि पोलीस शिपाही थोरात यांना डायल ११२ वर एक कॉल आला. फोनवरुन माहितीदेण्यात आली की एका दांपत्यात साधे भांडण झाले आहे आणि ज्येष्ठ व्यक्ती स्वतःला संपवण्याचा प्रयत्न करत आहे. माहिती मिळताच पोलिस ताबडतोब घटनास्थळी पोहोचले. तेथे पोहोचल्यावर कळले की ६० वर्षीय बालाजी गंगाराम मेहत्रे यांनी घराचा दरवाजा आतून बंद करून घेतला आहे आणि फाशी लावण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यानंतर पोलिसांनी वेळ न दवडता ताबडतोब दरवाजा तोडण्यास सुरुवात केली, जेणेकरून ते वेळेवर घरात पोहोचून व्यक्तीचा जीव वाचवू शकतील.



पोलिसांची होत आहे स्तुती

काही वेळातच वृद्ध व्यक्ती श्वास घेण्यास सुरुवात करते. पोलीस कर्मचाऱ्यांनी त्यांना ताबडतोब रिक्षात बसवून रुबी हॉल हॉस्पिटलमध्ये नेले. नातेवाईकांच्या म्हणण्यानुसार, सध्या बालाजी गंगाराम मेहत्रे यांची प्रकृती स्थिर आहे आणि ते धोक्याबाहेर आहेत. आता काळेपडळ पोलिसांच्या बीट मार्शलच्या या त्वरित कारवाईचा व्हीडिओ व्हायरल होत आहे आणि लोक त्यांच्या या कामाची प्रशंसा करत आहेत.

माथेरानमधले ४०० घोडे झाले बेघर... पोलिस बंदोबस्तात मोठी कारवाई

अश्वपाल बांधवांचा आक्रोश, कारवईमागचं कारण काय?



मुंबई। माथेरान गिरीस्थान हिरवाईने नटलेले, मुंबई-पुणेकरां सहित देश विदेशातील पर्यटकांना आवडणारे पर्यटनस्थळ आहे, पण या सुंदर डोंगरमाथ्यावरील शांती आणि पर्यटनाचा ताल आज विस्कळीत झाला आहे. माथेरानच्या दस्तुरी नाका परिसरात आज प्रशासनाने संयुक्तरीत्या केलेल्या कारवाईमुळे तब्बल ४०० घोडे बेघर झाले असून, घोडे व्यवसायावर आपलं जीवन अवलंबून ठेवणाऱ्या अश्वपाल समाजात प्रचंड संताप उसळला आहे.

नगरपालिका आणि महसूल विभागाने भूखंड क्र. 93 वर उभारण्यात आलेले घोड्यांचे प्लास्टिक शेड हटवले आहे. या जागेवर अश्वपाल समाज मागील अनेक वर्षांपासून तबेले उभारून घोड्यांची देखभाल करत होता. मात्र, वाहतूक कोंडी आणि पार्किंगच्या कारणावरून प्रशासनाने मोठ्या बंदोबस्तात ही कारवाई केली. परिणामी, माथेरानमधील मालवाहतूक, पर्यटन सेवा आणि स्थानिक व्यावसायिकांचे अर्थचक्रच ठप्प होण्याची भीती निर्माण झाली आहे.

माथेरान हे भारतातील एकमेव 'नो व्हेईकल झोन' क्षेत्र आहे. येथे वाहनबंदी असल्याने, हॉटेल्ससाठी अन्नपदार्थ, बांधकाम साहित्य, जीवनावश्यक वस्तू तसेच पर्यटकांची मालवाहतूक ही पूर्णपणे घोड्यांवर अवलंबून असते. त्यामुळे घोड्यांचा व्यवसाय हा या प्रदेशाच्या अर्थचक्राचा अविभाज्य भाग बनला आहे. पण आता या घोड्यांना निवारा उरला नाही, त्यामुळे अश्वपाल समाज अक्षरशः उघड्यावर आला आहे.

'तुमच्यावर मनी लॉंड्रिंगचा गुन्हा दाखल' अभियंत्याला फसवून ९ लाखांचा गंडा



अहिल्यानगर। सायबर गुन्हेगारांनी आता डिजिटल अरेस्टच्या नव्या जाळ्यात नागरिकांना अडकवण्यास सुरुवात केली असून, शहरातील एका अभियंत्याला तब्बल ४ लाख ४० हजारांचा गंडा घालण्यात आला आहे. मनी लॉंड्रिंगचा बनावट गुन्हा दाखल असल्याचा बनाव करून आणि मुंबई सायबर सेलच्या नावाखाली भीती निर्माण करत हा प्रकार २४ ऑक्टोबर रोजी घडला.

'तुमच्याकडून अवैध पार्सल पाठवण्यात आलं आहे, आणि तुमच्यावर मनी लॉंड्रिंगचा गुन्हा दाखल झाला आहे. तुम्हाला डिजिटल अरेस्ट केलं आहे', असं सांगत एका अभियंत्याला फसवलं याप्रकरणी ५१ वर्षीय अभियंत्याने सायबर पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फियार्दीला विजय पाल नावाच्या व्यक्तीचा फोन आला. त्याने सांगितलं की, 'तुमच्याकडून अवैध पार्सल पाठवण्यात आलं आहे आणि तुमच्यावर मनी लॉंड्रिंगचा गुन्हा दाखल झाला आहे. मुंबई सायबर सेलने तुम्हाला डिजिटल अरेस्ट केलं आहे'.

यानंतर व्हिडिओ कॉलद्वारे डिजिटल अरेस्ट दाखवून फियार्दीकडून गुन्हा मिटवण्यासाठी मोठी रक्कम मागवली. भीतीपोटी अभियंत्याने कान्हूर पठार मल्टीस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटीच्या खात्यातून ८ लाख ८० हजार रुपये राज आनंद ब्लुडार्ट नावाच्या खात्यावर ऑनलाइन पाठवले. नंतर फसवणूक झाल्याचं लक्षात येताच त्यांनी सायबर पोलिस ठाण्यात धाव घेतली. याप्रकरणी अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलिस निरीक्षक मोरेश्वर पेंदाम करत आहेत.

डिजिटल अरेस्टचा दुसरा प्रकार

याआधीच जिल्ह्यात श्रीरामपूर येथील डॉक्टरांची तब्बल ७ कोटी रुपयांची फसवणूक डिजिटल अरेस्टच्या नावाखाली करण्यात आली होती. आता पुन्हा अशा स्वरूपाची घटना घडल्याने नागरिकांमध्ये मोठी धास्ती निर्माण झाली आहे. पोलिसांनी कोणत्याही सरकारी यंत्रणेकडून व्हिडिओ कॉलद्वारे डिजिटल अरेस्ट केली जात नाही, असा इशारा दिला आहे.

सायबर पोलिसांनी इशारा दिला आहे. अनोळखी व्यक्तींकडून येणारे कॉल, मेसेज, ईमेल यावर विश्वास ठेवू नका. मनी लॉंड्रिंग,डिजिटल अरेस्ट, ड उ अपडेट अशा नावाखाली पैसे मागणारे हे सर्व प्रकार फसवणुकीचे आहेत नागरिकांनी याची दक्षता घ्यावी, असं पोलिसांनी आवाहन केलं आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका
प्रभाग समिती " एफ " धानिव/पेल्हार
ता.वसई, जि. पालघर ४०१ २०८

ईमेल - pelharbvvcmc@gmail.com
जा. क्र. वविशम/प्रसएफ/कर.वि./३०१४/२०२५-२६
दिनांक - ०७/११/२०२५

जाहिर नोटिस

वसई विरार शहर महानगरपालिका सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते की, खालील नमुद मिळकत बिलालपाडा विभागातील मालमत्ता धारकांनी हस्तांतरण कामी लेखी अर्ज तसेच कागदपत्रे सादर केली आहेत. उक्त फेरफार प्रकरणी कोणतीही हरकत / तक्रार असल्यास त्यांनी कार्यालयात जाहीर नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासून सात (७) दिवसांच्या आत लेखी हरकत / तक्रार कागदपत्रांसह नोंदवावी. सदर हरकत/तक्रार न आल्यास कार्यालय पुढील मालमत्ता हस्तांतरणाची कार्यवाही करण्यात येईल.

अ.क्र.	विभाग	नविन मा. क्र.		ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजेच विकणा-याचे किंवा करदात्याचे नाव	खरिददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव
		वॉर्ड क्र.	मा. क्र.		
१	बिलालपाडा	०२	२४०	जयप्रकाश चंद्रशेखर गुप्ता	अभिषेक रंजीत गुप्ता
२	बिलालपाडा	१०	२८८९	सविता दुबे	बिहारी हरिदास यादव / आशिष बिहारी यादव
३	बिलालपाडा	१०	६८४	सविनय सतेंद्र शहा	समीर नरायण शेलार / समीरा समीर शेलार
४	बिलालपाडा	०९	४८०/८१	महेंद्र नटवरलाल पटेल	संतोष कुमार मिश्रा
५	बिलालपाडा	०९	३८०/५	हंसराज वि कुमावत	अनुज ओमप्रकाश मेहता / अमृत रांका
६	बिलालपाडा	०१	७६५६/१	मतबर शिवधन कानु	संदीप S/O हरिश्चंद्र
७	बिलालपाडा	०३	१७१८	सफरुद्दीन हबीब शेख	मसरुर आलम शेख
८	बिलालपाडा	०१	२३/१	रघुनाथ मुकुंद घरत	सुरेंद्र बाळा घरत (वारसाहक्काने)
९	बिलालपाडा	०१	२४/१	रघुनाथ मुकुंद घरत	जयेश बाळा घरत (वारसाहक्काने)
१०	बिलालपाडा	०२	१०५२/१	अबुबकर अली रजा	अमिना अनीस अहमद सिद्धकी
११	बिलालपाडा	०३	२९०	अबरार अहमद रहमत अली खान	नौशाद / शमशाद अहमद सिराज अहमद शेख
१२	बिलालपाडा	१३	१७२९८	श्रीनाथ / श्रीकांत / श्रवणकुमार निषाद	श्रीनाथ ठगईप्रसाद निषाद (वारसाहक्काने)
१३	बिलालपाडा	०७	३७/५३	छोटेराम गरीबदास गुप्ता	शकुंतला विनय चौहान
१४	बिलालपाडा	०८	७१९४	मनोज तिवारी	सुबाष चंद्र बेचुलाल मौर्य
१५	बिलालपाडा	१३	१९४२७	अनुपमा जितेंद्र मौर्य	मंजु जितेंद्र मौर्य
१६	बिलालपाडा	१३	१६४१९/२	बाळकृष्णा बाबुराम गुप्ता	प्रभावती रामआसरे यादव
१७	बिलालपाडा	०१	३२४२	संगीता ओमप्रकाश मौर्या	राजेंद्र कुमार गिरी
१८	बिलालपाडा	०१	९००/११	अजबर अलि खान	विनोदकुमार राधेश्याम विश्वकर्मा
१९	बिलालपाडा	१३	१५७१६	अमितकुमार रामदेव गौतम	अयोध्याप्रसाद कामता प्रसाद साहु
२०	बिलालपाडा	१३	१३७७	रामेश्वरप्रसाद सुवालाल विजयवर्गी	भावेश रामेश्वर विजयवर्गी (वारसाहक्काने)
२१	बिलालपाडा	१३	१६८६८	महेंद्र रामस्नेही यादव	सुभावती देवी श्रीकृष्ण प्रजापति / श्रीकृष्ण रामअवध प्रजापति

(XXXXXXX)
सहा. आयुक्त
प्रभाग समिती "एफ "धानिव/पेल्हार
वसई विरार शहर महानगरपालिका

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com